महाराष्ट्र राज्य सेवा [वैद्यकीय देखभाल]
नियम १९६१

---

तातडीच्या परिस्थितीत खाजगी रुग्णालयात घेतलेल्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्तीची देयके विहित कालावधीत सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
परिपत्रक क्र. एमएजी-१०९१/१०२३/सी आर-८२/आरोग्य-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ७ जून, १९९१.

वाचा- शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी-१०८१/४९०७/ पीएच-९ अ, दि. २ जानेवारी १९८५.

## परिपत्रक

शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी-१०८१/४९०७/पीएच-९ अ, दि. २ जानेवारी ८५ अन्वये शासकीय कर्मचारी व त्याच्यावर अवलंबून असलेले कुटुंबियास आकस्मिक परिस्थितीत खाजगी रुग्णालयात तात्काळ उपचार घेतल्यानंतर देणाऱ्या वैधकीय खर्चाची देयके सादर करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे प्रसिध्द करण्यांत आली आहेत. त्यामध्ये वैद्यकीय देयक एक वर्षाच्या विहित कालमर्यादित सादर करण्यांबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, कर्मचाऱ्यांने विहित मुदतीत देयक सादर करूनही प्रशासकीय स्तरावर देयक अंतिम मंजूरीसाठी सक्षम अधिकाऱ्यास सादर करण्यास विलंब होण्याची प्रकरणे वाढली आहेत. त्यामुळे संबंधित कर्मचारी विलंबास जबाबदार नसल्यामुळे प्रशासकीय स्तरावर झालेला विलंब क्षमापित करणे भाग पडते.

२. असा विलंब टाळण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

संबंधित कर्मचाऱ्याने देयक सादर केल्यानंतर शा. प. क्र. एमएजी-१०९१/४९०७/आर-९ अ, दि. २ जानेवारी १९८५ अन्वये देयके सादर करण्यासाठी जी मार्गदर्शक तत्वे दिली आहेत त्याप्रमाणे तपासून तसेच आवश्यक दाखले, प्रमाणपत्रे जोडली आहेत किंवा नाही हे तपासून देयक परिपूर्णरित्या सादर केले आहे याची खात्री करूनच त्याचा स्वीकार करण्यात यावा. जोपर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांची परिपूर्ती होऊन देयक प्राप्त होत नाही तोपर्यंतचा कालावधी हा संबंधित कर्मचाऱ्यातर्फे झालेला विलंब कालावधी समजण्यात यावा. एकदा देयक परिपूर्ण आहे हे तपासून त्याचा कार्यालयीन स्तरावर कार्यवाहीसाठी स्वीकार झाला की त्या दिवसापासूनचा कालावधी हा प्रशासकीय कालावधी

...२...



www.lekhamitra.blogspot.com

समजण्यात यावा. त्याप्रमाणे देयक सादर करण्यास विलंब झाल्यास, विलंबाची समर्थनीय कारणे प्रस्तावात नमूद करण्यात यावीत. अन्यथा अशा देयकांचा मंजुरीसाठी स्वीकार करण्यात येवू नये.

हे परिपत्रक, वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्र. ४५८/९१/सेवा ५, दिनांक २३.५.९१ अन्वये रवाना करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ भा. ल. निकम ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,
सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र शासन,
मुख्य मंत्र्यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
विधानमंडळातील अध्यक्ष/उपाध्यक्ष/सभापती/उपसभापती/विरोधी पक्ष नेते यांचे स्वीय सहाय्यक.
सेटलमेंट कमिशनर अॅन्ड डायरेक्टर ऑफ लॅण्ड रेकॉर्डस, पुणे,
सर्व विभागीय आयुक्त,
नियंत्रक, आर्यन, स्टील व सिमेंट, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
वैद्यकीय सेवेतील सर्व उपसंचालक,
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक,
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी,
बृहन्मुंबईतील सर्व शासकीय रूग्णालयाचे अधीक्षक,
आयुर्वेद संचालक, मुंबई.
मॅनेजिंग डायरेक्टर, हाफकीन बायो फार्मास्युटिकल कार्पोरेशन, लि., मुंबई,
सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाते, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी, कामगार राज्य विमा योजना, मुंबई.
ए.एम.ओ.इ.एस.आय.एस. विदर्भ रिजन, नागपूर.
अधीक्षक, पुणे उरो रूग्णालय, औंध कॅम्प, पुणे.
सी.एम.ओ., आय.डी. कंट्रोल आणि ट्रेनिंग सेंटर, नागपूर.
अधीक्षक, सामान्य रूग्णालय व टी.बी. सॅनिटोरियम, अंबेजोगाई, जि. बीड.
सहाय्यक शल्य चिकित्सक, टी.बी. सॅनिटोरियम, गोंदीया,
वैद्यकीय अधिकारी, सी.जी. राठी क्षयरोग रूग्णालय, अमरावती,



www.lekhamitra.blogspot.com